# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
## Date – 07 April 2024
## Time 7.10 AM to 7.20 AM
## Language Marathi
## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर
## प्रादेशिक बातम्या
## दिनांक ०७ एप्रिल २०२४ सकाळी ७.१० मि.

****

- यंदाच्या लोकसभा निवडणुकीत मोठी वाढ झालेल्या महिला मतदारांची भूमिका महत्त्वाची
- पहिल्या टप्प्यात प्रचाराला वेग;दुसऱ्या टप्प्यात अर्ज माघारीचा उद्या शेवटचा दिवस
- लोकसभा निवडणुकीत महायुतीचं काम न करता तटस्थ राहण्याचा आरपीआयचा निर्णय

आणि

- धाराशिव जिल्ह्यात जमिनीच्या खोट्या नोंदी प्रकरणी २४ सेवा केंद्र चालकांवर गुन्हा दाखल

****

यंदाच्या लोकसभा निवडणुकीत उमेदवारांचं भवितव्य ठरवण्यात यंदा महिला मतदारांची भूमिका महत्त्वाची असेल. २००४, २००९, २०१४, आणि २०१९ च्या तुलनेपेक्षा २०२४ मध्ये महिला मतदारांची संख्या वाढली असल्याची माहिती निवडणूक आयोगानं दिली आहे. महिला मतदारांमध्ये मतदानाबाबत जागृतीसाठी निवडणूक आयोगाकडून, “स्वीप” कार्यक्रमाच्या माध्यमातून विविध उपक्रम राबवले जात आहेत. महिला मतदारांची नोंदणी वाढवण्यासाठी अंगणवाडी सेविका, आशा कर्मचारी, परिचारिका, महिला बचत गट, तसंच अशासकीय संस्थांचं सहकार्य घेण्यात येत आहे. शिवाय उद्योग, शिक्षण, सामाजिक, साहित्य, कला-संस्कृती यासह विविध क्षेत्रातल्या अग्रणी महिलांच्या माध्यमातून महिलांना मतदार नोंदणीसाठी प्रोत्साहित करण्यात येत आहे.

****

लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्याच्या प्रचाराला वेग आला आहे. मोठ्या राजकीय पक्षांच्या स्टार प्रचारकांच्या जाहीर सभा ठिकठिकाणी होत आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल सकाळी उत्तरप्रदेशातल्या सहारनपूर इथं, तर दुपारी राजस्थानमध्ये पुष्कर इथं सभा घेतली. त्यानंतर उत्तरप्रदेशात गाझियाबाद इथं रोड शो मध्ये मोदी सहभागी झाले होते. भाजपचे ज्येष्ठ नेते नितीन गडकरी यांनी यवतमाळ जिल्ह्यात पांढरकवडा इथं प्रचार सभा घेतली.

काँग्रेस पक्षाच्या वतीने काल राजस्थानात जयपूर इथं पक्षाच्या जाहीरनाम्याच्या अनुषंगानं मोठी प्रचार सभा घेण्यात आली. त्यामध्ये पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, ज्येष्ठ नेत्या सोनिया गांधी आणि राहुल गांधी उपस्थित होते.

दरम्यान, काँग्रेस पक्षानं काल आणखी सहा उमेदवारांच्या नावांची घोषणा केली. यामध्ये मध्य प्रदेशातल्या तीन, गोव्यातल्या दोन, तर दादरा आणि नगर हवेली इथल्या एका उमेदवाराचा समावेश आहे.

****

लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत उद्या आठ तारखेला संपत आहे. नांदेड लोकसभा मतदारसंघात मोहनराव वाघमारे या उमेदवाराने काल अर्ज मागे घेतला. त्यामुळे पात्र ६६ उमेदवारांपैकी आता ६५ उमेदवार उरले आहेत.

****

लोकसभा निवडणुकीत रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाने महायुतीचं काम न करता तटस्थ राहण्याचा निर्णय घेतला आहे. अहमदनगर इथं काल झालेल्या निर्धार मेळाव्यात हा निर्णय घेण्यात आला. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाने लोकसभेच्या निवडणुकीसाठी महायुतीकडून शिर्डी आणि सोलापूरच्या जागेची मागणी केली होती, ती मान्य होत नसल्या कारणाने पक्ष तटस्थ राहणार असल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे सदस्य आणि माजी मंत्री बबनराव घोलप तसंच माजी आमदार संजय पवार यांनी कार्यकर्त्यांसह काल शिवसेनेमध्ये प्रवेश केला. मुंबईत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम झाला.

****

वंचित बहुजन आघाडीनं शिरुरमधून मंगलदास बांदल यांना दिलेली उमेदवारी मागे घेतली आहे. बांदल यांनी बारामती लोकसभा मतदारसंघात पक्षविरोधी भूमिका घेतल्यानं पक्षानं ही कारवाई केली.

****

शिवसेना शिंदे गटाचे कल्याणचे विद्यमान खासदार डॉ. श्रीकांत शिंदे हेच महायुतीचे उमेदवार असतील, असं भाजप नेते आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केलं आहे. भाजपा पक्ष स्थापना दिनानिमित्त नागपुरात झालेल्या कार्यक्रमानंतर ते वार्ताहरांशी बोलत होते.

****

श्रोतेहो, लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर 'लोकनिर्णय महाराष्ट्राचा' हा कार्यक्रम, आकाशवाणीनं सुरू केला आहे. कार्यक्रमाच्या आजच्या भागात आपण हिंगोली लोकसभा मतदार संघाचा घेतलेला आढावा ऐकणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात वाजता हा कार्यक्रम ऐकता येईल.

****

परभणी जिल्ह्यात मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी इंडियन मेडिकल असोसिएशनच्या परभणी शाखेच्या वतीने मतदान केलेल्या नागरिकांना तपासणी शुल्कात ३० टक्के सूट देण्यात येणार आहे. मतदानाच्या तारखेसह दोन दिवस ही सवलत लागू असेल. संघटनेचे जिल्हाध्यक्ष डॉ राजगोपाल कालानी यांनी ही माहिती दिली.

दरम्यान, जिल्ह्यात मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी जास्तीत जास्त नागरिकांनी मतदान करावं, आणि नागरिकांमध्ये जनजागृती करण्यासाठी सामाजिक संघटना आणि संस्थांनी पुढाकार घेण्याचं आवाहन जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांनी केलं आहे.

***''स्वीपच्या अंतर्गत आपण वेगवगळ्या संस्था, संघटना, सामाजिक संस्था यांना बोलवून आवाहन केलं होतं की, २६ तारखेला मतदाना टक्का वाढवण्यासाठी आपणही आपल्या ज्या दैनंदिन सेवा आहेत, त्यामध्ये काहीतरी सूट जाहीर करावी. तात्काळ इंडियन मेडिकल असोसिएशनने त्याला चांगला प्रतिसाद दिला. आणि त्या माध्यमातून त्यांनी असं एक निवेदन आमच्याकडे दिलं की, दिनांक २६ व २७ एप्रिल रोजी जे कोणी नागरिक मतदान केल्याची बोटाची शाई दाखवून आमच्याकडे उपचारासाठी***

***येतील त्यांना तपासणी शुल्कमध्ये ३० टक्के अशी भरघोस सूट देणार आहेत. आणि अजून काही संघटनांनी पुढं येऊन नागरिकांसाठी मतदानासाठी सूट द्यावी, असं मी त्यांना जाहीर आवाहन करतो. धन्यवाद.''***

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातल्या सिल्लोड, कन्नड, गंगापूर आणि वैजापूर विधानसभा मतदारसंघ निहाय प्रशिक्षण काल जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या उपस्थितीत पार पडलं. निवडणूक कामकाजाला आत्मविश्वासाने सामोरे जाण्याचं आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केलं.

****

नांदेड जिल्ह्यात समाज माध्यमांचा गैरवापर केल्याप्रकरणी एकाविरुद गुन्हा दाखल करण्यात आला असून, चौघांना नोटीस बजावण्यात आली आहे. आक्षेपार्ह पोस्ट करणाऱ्या १३ जणांचा पोलिसांकडून शोध सुरू आहे.

****

निवडणुकीत मतदानाचा टक्का वाढवण्यासाठी लातूर जिल्ह्यात उद्या सोमवारी सकाळी आठ वाजता गाव ते जिल्हास्तरावर मतदार जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात येणार आहे.

****

धाराशिव जिल्ह्यातल्या सुमारे दोन हजार ९९४ पूर्णांक ५४ हेक्टर शासकीय जमिनीची शेतकऱ्यांच्या नावावर खोटी नोंद करत, ऑनलाईन सेवा केंद्र चालकांनी शासनाची आणि विमा कंपन्यांची फसवणूक केल्याचं उघड झालं आहे. या प्रकरणी २४ सेवा केंद्र चालकांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यात बीड जिल्ह्यातले १६, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातले दोन, परभणी दोन, नांदेड एक, तसंच सोलापूर एक आणि धाराशिव जिल्ह्यातल्या एका सेवा केंद्राचा समावेश आहे. शासकीय जमिनीचे कोणतेही भाडेकरार किंवा संमतीपत्र नसतांना सुमारे एक हजार एकशे सत्तर शेतकऱ्यांच्या नावावर खोट्या नोंदी दाखवत हा पीक विमा या केंद्र चालकांनी भरला होता, असं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

मुलामुलींना शिक्षणाच्या मुळ प्रवाहात आणल्यास समृद्ध राष्ट्र निर्माण होईल, असं बीड जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव जी. जी. सोनी यांनी म्हटलं आहे. बालविवाह जनजागृती अभियान, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण आणि विवेकानंद

विद्यामंदिर, यांच्या संयुक्त विद्यमाने काल घेण्यात आलेल्या एका कार्यक्रमात ते बोलत होते.

****

नांदेड इथल्या कवयित्री मीनाक्षी आचमे-चित्तरवाड यांच्या `इट्टुकली पिट्टुकली` बाल कवितासंग्रहाला अखिल भारतीय मराठी प्रकाशक संघाचे दोन पुरस्कार जाहीर झाले आहेत. शिशुसाहित्य या विभागात उत्कृष्ट प्रकाशनासाठीचा प्रथम पुरस्कार, तर या संग्रहाचे मुखपृष्ठ करणारे चित्रकार संतोष घोंगडे यांनाही उत्कृष्ट मुखपृष्ठासाठीचा पुरस्कार जाहीर झाला आहे. येत्या २८ एप्रिल रोजी पुणे इथं या पुरस्कारांचं वितरण होणार असल्याची माहिती, इसाप प्रकाशनाचे दत्ता डांगे यांनी दिली.

****

आंतरराष्ट्रीय जागतिक क्रीडा विकास आणि शांती दिनानिमित्त काल परभणी इथल्या क्रीडा संकुलात स्वच्छता अभियान राबवण्यात आलं. जिल्ह्यातील्या खेळ संघटना, क्रीडा प्रेमी नागरिक, खेळाडू, प्रशिक्षक या मोहिमेत सहभागी झाले होते.

****

धाराशिव जिल्ह्यात तुळजापूर इथल्या वीज वितरण कंपनीतले वरिष्ठ तंत्रज्ञ नितीन सीतापे आणि किशोर हंगरगेकर यांना पाच हजार रुपये लाच घेताना काल पकडण्यात आलं. हंगरगा इथं वीज वितरण व्यवस्थेच्या दुरुस्तीसाठी त्यांनी ही लाच मागितली होती.

****

लातूर इथं काल जिल्हा बाल विकास आणि उपचार केंद्र आणि उमंग संस्थेच्या वतीनं जागतिक स्वमग्नता दिननिमित्त विशेष शिबिर आणि कार्यशाळा घेण्यात आली. एकूण ४२ बाल रुग्णांची यावेळी तपासणी करुन योग्य उपचार करण्यात आले.

****

छत्रपती संभाजीनगर इथं डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापिठात कुस्तीच्या राज्यस्तरीय वरीष्ठ महिला अजिंक्यपद स्पर्धा आणि महिला महाराष्ट्र केसरी स्पर्धेचं उद्घाटन काल झालं. कोल्हापूर, सातारा, अहमदनगरसह पिंपरीचंचवड इथल्या महिला मल्लांनी उपांत्य फेरीत धडक मारली आहे.

****

छत्रपती संभाजीनगर शहरातल्या डॉ. आंबेडकर मेडिकोज असोसिएशन, ऑल इंडिया डॉक्टर्स फॉर ईक्कॉलिटी अँड एजिटेशन, इंजिनियर्स असोसीएशन पी.ई.एस आणि  विविध सामाजिक संघटनांच्या संयुक्त विद्यमाने येत्या १४ एप्रिल रोजी 'रन फॉर इक्कालिटी' मॅरेथॉन स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. शहरातल्या नागसेनवन परिसरातल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर कला आणि वाणिज्य महाविद्यालयाच्या मैदानापासून सकाळी पाच वाजून ५० मिनिटांनी ही स्पर्धा सुरु होईल.

****

भारत आणि ऑस्ट्रेलिया हॉकी संघादरम्यानच्या पाच सामन्यांच्या मालिकेतल्या काल पर्थ इथं झालेल्या पहिल्या सामन्यात ऑस्ट्रेलियानं भारताचा पाच – एक असा पराभव केला. मालिकेतला दुसरा सामना आज होणार आहे.

****

हवामान

राज्यात येत्या दोन दिवसात मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह पावसाची शक्यता असल्याचं हवामान विभागानं म्हटलं आहे. मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट होण्याची शक्यता आहे.

****